**वाचा** :-१. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

२. प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन, महसूल व वने, मंत्रालय यांचे कडील पत्र दिनांक ५ फेब्रुवारी२०२०

३. भारत सरकार, गृह मंत्रालय यांचे कडील पत्र क्रमांक १३७/२०१८/ FTS१०५४८ दिनांक ४ फेब्रुवारी, २०२०.

---

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा**
**क्र.नैआ/कावि/ ६११ /२०२०**
**दिनांक :-११/०३/२०२०**

## आदेश

ज्याअर्थी,आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोटकलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, अंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना विषाणू संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहे. तसेच अंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाद्वारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहे. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूचे संसार्गात अधिक वाढ होवू न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. सदर संशयित रुग्णांमुळे आपत्तीजनक परिस्थिती सातारा जिल्ह्यात उद्भवू नये यासाठी पूर्वतयारी करणे अगत्याचे झाले आहे.

या पार्श्वभूमीवर मी **शेखर सिंह, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, सातारा** जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ लागु झाल्याचे या आदेशाद्वारे घोषीत करीत आहे. उक्त पूर्वतयारी व प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी **Incident Commander** म्हणून **श्री. डॉ. अमोद गडीकर, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सातारा मो.** 9422471912 cssatara@rediffmail.com **व श्री. डॉ. अनिरुध्द आठल्ये, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा मो.** 9421233250 **dhozpsatara@gmail.com** यांना सनियंत्रक म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

त्याअर्थी ,मी शेखर सिंह , अध्यक्ष , जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सातारा जिल्हयातील टुर्स कंपनीमार्फत सातारा येथील नागरिकांसाठी राष्ट्रीय अथवा आंतरराष्टीय , जिल्हास्तरीय टुर्सचे आयोजन करणेस , तसेच इतर टुर्सने अथवा खाजगी व्यक्तीने सातारा जिल्हयात बाहेरुन आयोजित केलेले टुर्स किंवा दौरे कार्यक्रमाचे या जिल्हयात अंमलबजावणी करणेस, ग्रुप सहलीचे आयोजन करणेस व इतर जिल्हयाबाहेरील ठिकाणी सुरक्षिततेच्या कारणास्तव पर्यटनस्थळी अथवा धार्मिकस्थळी कोणत्याही प्रकारच्या सहलीचे आयोजन करणेस सक्त मनाई करीत आहे.

**(शेखर सिंह)**
**जिल्हाधिकारी सातारा तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सातारा**

**प्रत : उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सातारा यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**

2/- आपलेमार्फत जिल्हयातील सर्व संबंधित टुर्स आणि ट्रॅव्हल्स एजन्सीचे चालक-मालक यांना आपलेस्तरावरुन याबाबत सूचित करणेत यावे.

Scanned by CamScanner